नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३४ Issue - 34 | वार - रविवार दि. २८ जून २०२६ Blow- Sunday Date 28 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भिवंडीत टीईटी पेपरफुटीचा मोठा पर्दाफाश; दीड कोटींमध्ये विक्रीसाठी आणलेले प्रश्नपत्रिका जप्त, तिघांना अटक

## कोनगाव पोलिसांची धडक कारवाई; चार प्रश्नपत्रिका संच, डेबिट-क्रेडिट कार्ड जप्त; मुख्य सूत्रधार फरार, एसआयटीमार्फत बहुराज्यीय तपास सुरु



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राज्यभर आयोजित करण्यात येणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ पूर्वीच प्रश्नपत्रिका फुटल्याचा म ोठा प्रकार भिवंडीत उघडकीस आला आहे. कोनगाव पोलिसांनी सापळा रचून दीड कोटी रुपयांत प्रश्नपत्रिका विक्रीसाठी आणणाऱ्या तिघांना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून टीईटी परीक्षेच्या चार प्रश्नपत्रिका संचांसह डेबिट व क्रेडिट कार्ड जप्त करण्यात आले आहेत. या घटनेमुळे राज्यातील सुमारे २३ लाख परीक्षार्थ्यांना मोठा धक्का बसला असून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेला नियोजित परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परिमंडळ-२ चे पोलिस उपायुक्त डॉ. पवन बनसोड यांना गुप्त माहिती मिळाली होती की, काही जण टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका विकण्यासाठी भिवंडीतील कोनगाव परिसरात येणार आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास तिघांना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये बिहारमधील राजू शॉ (वय ४५) व आकाश कुमार (वय ३०) तसेच हरियाणातील धीरज सिंह (वय २८) यांचा समावेश आहे. प्राथमिक चौकशीत हे तिघे दिल्लीहून प्रश्नपत्रिका घेऊन भिवंडीत आले असल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी जप्त करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकांची पडताळणी केली असता त्या २८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेच्याच असल्याची खात्री झाली. तपासात आरोपी या प्रश्नपत्रिका तब्बल दीड कोटी रुपयांत विकण्याच्या तयारीत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

अपर पोलिस आयुक्त अशोक दुधे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आरोपींपैकी एक जण केंद्रीय विद्यालयात नोकरी ला-वून देण्याच्या नावाखाली आर्थिक व्यवहार करत होता, तर दुसरा केंद्रीय स्तरा-वरील स्पर्धा परीक्षेत अपयशी ठरलेला उमेदवार आहे. या प्रकरणात मुख्य सूत्रधार अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. या प्रकरणी कोनगाव पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१८(४), ३१६(५) आणि ६१(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. प्रश्नपत्रिका नेमकी कुठून लीक झाली, ती कोणाला विकली जाणार होती आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा सखोल तपास सुरू आहे. या गंभीर प्रकरणाच्या तपासासाठी दोन सहाय्यक पोलिस आयुक्त, नऊ पोलिस निरीक्षक आणि २० पोलिस कर्मचाऱ्यांचे विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. हे पथक तपासासाठी आवश्यकतेनुसार विविध राज्यांमध्ये जाऊन चौकशी करणार आहे. या पेपरफुटीमागे संघटित टोळी कार्यरत असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून त्या अनुषंगानेही तपास सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून २८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. परीक्षेची नवीन तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे परिषदेने स्पष्ट केले आहे.

# मुंबईत मोहरम मिरवणुकीत १४,९०० विषारी कॅप्सूल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : मुंबईच्या भायखळा परिसरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. मोहरमच्या मिरवणुकीदरम्यान उंदीर मारण्यासाठी विषारी गोळ्या वाटल्याप्रकरणी भायखळा पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली आहे. अधिकाऱ्यांनी संशयिताकडून एकूण १४,९०० (१४,९००) विषारी गोळ्या जप्त केल्या आहेत. या घटनेमागे एक मोठे षडयंत्र असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मोहरमच्या दिवशी चार जणांना कॅप्सूल वाटत असताना भायखळा पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली. पोलीस उपआयुक्त जयंत मीना यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, मिरवणुकीदरम्यान आरोपी परवानगीशिवाय कॅप्सूल वाटत असल्याचे पाहून पोलिसांना संशय आला. तपासादरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून १४,९०० विषारी कॅप्सूल जप्त केल्या. या कॅप्सूलमध्ये झिंक फॉस्फाईड असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. या कॅप्सूलचे सेवन केलेल्या एका व्यक्तीची प्रकृती खाला-वली असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या कारवाई दरम्यान पोलिसांनी संशयिताकडून १४,९०० कॅप्सूल जप्त केल्या. तपासात असेही उघड झाले की, त्याने ३०,००० रिकाम्या कॅप्सूल आणि ५० किलो फॉस्फरसची मागणी केली होती.आरोपी हा बीबीए पदवीधर असून त्याचा पेंन्ट व्यवसाय आहे. आरोप-ीने या आधी इराक देशाचा दौरा केल्याचा पोलीस तपासातून समोर आले आहे. दरम्यान,आरोपीचा कोणत्याही दहशतवादी संघटनेशी संबंध आहे का, तसेच मोठा घा-तपात घडवून आणण्याचा त्याचा उद्देश होता का, याचा सर्व बाजूंनी तपास भायखळा पोलीस करत आहेत. तपास पूर्ण होईपर्यंत या प्रकरणामागील नेमका हेतू स्पष्ट झालेला नसल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

## विजांच्या कडकडाटासह ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा अंदाज

# महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांना यलो अलर्ट; लवकरच पावसाच्या सरी बरसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वाढत्या उष्णते मध्ये दिलासादायक गोष्ट समोर आली आहे. २८ जून रोजीही राज्यातील २७ जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळ-धार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.



मॉन्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्यानंतर राज्यात पावसासाठी पोषक वातावरण कायम आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यातील अनेक भागांत पावसाची संततधार सुरू असून २७ जून रोजीही अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. दरम्यान, २८ जून रोजीही राज्यातील २७ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

कोकण विभागातील पालघर, ठाणे आणि मुंबई परिसरात विजांच्या कडकडाटासह तसेच वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार पा-वसाचा अंदाज आहे. या चारही ठिकाणी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्या-तही वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

पुणे, सातारा, कोल्हापूर आणि घाटमाथा परिसरात विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. या भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात. सांगली आणि सोला-पूर जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यांसह पावसा-ची शक्यता कायम आहे.मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. हिंगोली जिल्ह्यातही काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पा-वसाची शक्यता आहे.

नाशिक घाटमाथा आणि अहिल्यानगर जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज असल्याने या भागांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.राज्यात पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. त्यामुळे नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आ-वाहन करण्यात आले आहे.



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्राची संपूर्ण अर्थव्यवस्था आणि संस्कृती ही कृषी क्षेत्राभोवती फिरते. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे. कधी अवेळी येणारा पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळिराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांना पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'.ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

महाकर्जमुक्तीची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे.



या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

योजनेचे त्रिसूत्र कर्जमुक्ती एकवेळा समजोता आणि प्रोत्साहनपर लाभ

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे:

यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती: जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

एकवेळ समझोता योजना (जढड): ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' (जढड) म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी

आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन: अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता

कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यास राज्य शासनाने

'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे.

सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन: आधार प्रमाणिकर अनिवार्य

शेकऱ्यांनीयोजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे.पात्र शेकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ट नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.आणि एकवेळ समझोता (जढड) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

प्रशासकीय समन्वय

सहकार विभाग, जिल्हाधिकारी, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि बळिराजाला सन्मानाने जगण्याचा नवा विश्वास देणारा ठरणार आहे.

**काशीबाई थोरात–धायगुडे**
**(वरिष्ठ सहायक संचालक )**

---




# एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेत नेटवर्किंग स्वयंसेवी संस्थांसाठी सर्वसमावेशक लैंगिकता शिक्षण विषयक प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (एफपीएआय), सोलापूर शाखेच्या वतीने यंग पीपल प्रोग्राम अंतर्गत नेटवर्किंग स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींसाठी सर्वसमावेशक लैंगिकता शिक्षण या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाचा उद्देश किशोरवयीन मुला-मुलींच्या आरोग्य, सुरक्षितता व सर्वांगीण विकासासाठी कार्यरत संस्थांमध्ये समन्वय वाढविणे आणि सीएसई विषयक प्रभावी जनजागृती करणे हा होता.

या प्रशिक्षणाचे मार्गदर्शन शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गडगडे, क्षेत्रीय कार्यकर्त्या श्रुती कोल्हापुरे तसेच परिचारिका स्नेहा जटाळा यांनी केले.

कार्यक्रमात बालकल्याण समिती, सोलापूर जिल्हा, निरामय आरोग्यधाम एफ.एस.डब्ल्यू टार्गेटेड इंटरव्हेन्शन प्रकल्प, एम.एस.एम/टी.जी. टार्गेटेड इंटरव्हेन्शन प्रकल्प, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचा स्थलांतरित व ट्रकर्स प्रकल्प, नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिव्हिंग विथ एचआयव्ही/एड्स (समग्र प्रकल्प), श्रीमती गोपाबाई दामाणी रक्तसंकलन केंद्र, डॉ. हेडगेवार रक्तपेढी, चाईल्डलाईन १०९८ आणि सखी वन स्टॉप सेंटर या संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

प्रारंभी सुगतरत्न गायकवाड यांनी विविध नेटवर्किंग संस्थांमधील समन्वयाचे महत्त्व स्पष्ट करून यंग पीपल प्रोग्राम आणि सर्वसमावेशक लैंगिकता शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे व अपेक्षित परिणाम याविषयी सविस्तर माहिती दिली. युवक-युवतींना वैज्ञानिक, अचूक व वयाला अनुरूप माहिती उपलब्ध करून देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

कल्पना गडगडे यांनी सी.एस.ई. विषयाची ओळख करून देताना किशोरावस्था व त्यातील शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदल, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन, पौष्टिक आहार, एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, कर्करोग जनजागृती तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (झजउडज) कायदा यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच एफ.पी.ए.आय सोलापूर शाखेमार्फत शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये नेटवर्किंग संस्थांच्या सहभागाची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

श्रुती कोल्हापुरे यांनी सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) चे फायदे व संभाव्य धोके, बालकल्याण आणि बालसंरक्षण यांसंदर्भात नेटवर्किंग संस्थांची भूमिका स्पष्ट केली. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात किशोरवयीन मुलांमध्ये डिजिटल साक्षरता आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकीदरम्यान सहभागी संस्थांच्या प्रतिनिधींनी एफ.पी.ए.आय सोलापूर शाखेच्या यंग पीपल प्रोग्राममध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याची तयारी दर्शविली. भविष्यात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम, जनजागृती उपक्रम आणि शैक्षणिक सत्रांमध्ये सहभागी होण्याबरोबरच प्रत्येक संस्थेने आपल्या तज्ज्ञतेनुसार किमान एक सत्र आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

या प्रशिक्षणादरम्यान विविध स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींशी सीएसई कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात चर्चा करण्यात आली. या चर्चेमुळे परस्पर समन्वय अधिक बळकट होण्यास मदत झाली तसेच किशोरवयीन मुलांमध्ये सर्वसमावेशक लैंगिकता शिक्षणाचे महत्त्व पोहोचविण्यासाठी संयुक्त प्रयत्नांची दिशा निश्चित झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी केले. प्रकल्पाचा उद्देश सुगतरत्न गायकवाड यांनी स्पष्ट केला, तर स्नेहा जटाळा यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

---

# कळंब येथील संत शिरोमणी मन्मथ स्वामी मंदिरात आयोजित ध्यान योग प्राणायाम शिबिराची सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी :- गेली २२ वर्ष योगशिक्षक शशी कुमार भातलवंडे ३६५ दिवस ऊन पाऊस व थंडी या काळात सातत्यपूर्ण मोफत ध्यान योग प्राणायाम वर्ग घेतात , एखादे काम एखादे वर्ष ठीक आहे परंतु बावीस वर्ष अखंड योगसाधना आहे, यामुळे हजारो लोकांना होणारे व्याधी व आजार यापासून मुक्ती मिळाली आहे, त्यांना जीवन जगण्याचा आनंद घेता येत आहे

२०१० मध्येभातलवंडे यांनी आयोजित केलेल्या शिबिरात उपस्थिती लावली व योग प्राणायाम याशी जोडला गेलो मी सुद्धा दररोज योग प्राणायाम करत आहे असे विचार नॅचरल शुगर रांजणीचे संस्थापक चेअरमन कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांनी ध्यान योग प्राणायाम शिबिर सांगता समारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना व्यक्त केले मंचावर हृदयरोग तज्ञ डॉ. महादेव कोरसाळे, कृषी अभ्यासक पांडुरंग आवाड, नगरसेवक सागर मुंडे व योगशिक्षक शशीकुमार भातलवंडे यांची प्रमुख उपस्थिती होती २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त पतंजली योग समिती कळंब व संत शिरोमणी मनमथ स्वामी सेवा भावी संस्था कळंब च्या वतीने संत शिरोमणी मन्मथ स्वामी

मंदिर येथे दि.१७ जून ते २१ या कालावधी मोफत ज्ञान योग प्राणायाम शिबिर घेण्यात आले या शिबिरात प्रसिद्ध योगशिक्षक कळंब भूषण शशीकुमार भातलवंडे यांनी दररोज पहाटे पाच ते सात यावेळेत ध्यान योग प्राणायाम याविषयी प्रात्यक्षिके तसेच प्रबोधनपर विचारातून निरोगी राहण्याचा सल्ला दिला यामुळे निश्चित बीपी, शुगर कोलेस्ट्रॉल तसेच अनेक आजार नित्य प्राणायामामुळे बरे होतात असे सांगितले याचबरोबर तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे असे आवाहन त्यांनी केले २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन असल्याने या दिवशी पहाटे ते सहा या वेळेत नित्य ध्यान प्राणायाम




योग व नंतर सकाळी सात वाजता सांगता समारंभ संपन्न झाला या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नॅचरल शुगरचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बि.बि.ठोंबरे, कळंब येथील प्रसिद्ध हृदय रोग तज्ञ डॉ. कोरसाळे यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे आयोजन राजेंद्र (आबा) मुंडे संस्थापक/अध्यक्ष संत शिरोमणी मन्मथ स्वामी सेवाभावी संस्था कळंब तसेच अध्यक्ष सागर मुंडे पतंजली योग समिती कळंब चे महामंत्री महारूद्र हुंडेकरी , संघटक डॉ. प्रा. अनंत नरवडे, यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले तर या कार्यक्रमात डॉ. राजेंद्र बावळे , डॉ. गिरीश कुलकर्णी, शिवराज पाटील, नाना शिंगणापूरे, किरण पल्ले, अनिल कुलकर्णी, शिवराज मेनकुदळे, संभाजी महामुनी, शिवहार घोंगडे, रामभाऊ बाबर,अर्चना भातलवंडे, राजकन्या गवळी, जयश्री बाराते, कुंदाताई हुंडेकरी, महानंदा पाटील, महानंदा पारखे यांनी परिश्रम घेतले.

---

# आ. नारायण पाटील यांनी आदिनाथ बद्दल जनतेसमोर स्पष्ट भूमिका मांडावी: अध्यक्ष दशरथ कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा आमदार नारायण आबा पाटील यांनी कारखान्याबद्दल जी परिस्थिती आहे ती टोक सांगावी अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष कांबळे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केली आहे. आदिनाथ सहकारी साखर कारखान्याची सभासद शेतकरी आहे. कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा आहे तो कारखाना चालला पाहिजे याच्यातच राजकारण करणे योग्य नाही. ते शेतकऱ्यांचे मंदिर आहे त्याबद्दल सध्या काय परिस्थिती आहे ते आमदार पाटील यांनी सांगणे आवश्यक आहे कारखान्याला विकला नाही पाहिजे चालवायला दिला तरी चालेल परंतु याबाबत संभ्रम अवस्था शेतकऱ्यांच्या आहे कारखाना कुठल्या तरी कंपनीला चालवायला दिले असल्याचे समजते. त्यामागे एक मोठी राजकीय पुढारी असल्याचे समजते याबाबत मोठा आर्थिक व्यवहार असल्याचेही चर्चा आहे हे खरे आहे का कुठे आम्हाला माहीत नाही याबाबत शेतकऱ्यांमध्ये मोठी चर्चा होत आहे त्यामुळे विद्यमान सत्ताधारी मंडळी फक्त बोर्ड मीटिंग घेऊन कारखान्याची प्रोसेस करू नये. सर्व शेतकऱ्यांनी सभा बोलवून योग्य ती निर्णय घ्यावा तसेच विविध बँकेची कर्ज आहे बारामती या रोजी काय करणार, कारखाना तुम्ही विकणार आहे का चालवला देणार आहे कर्मचारीवर्ग वाहतूकदार,कशा पद्धतीने सोडवले जातील त्याची माहिती देणे आवश्यक आहे याबाबत आमदार नारायण पाटील यांनी स्पष्ट भूमिका घेतली नाही तर कारखाना स्थळावर कारखाना कर्मचारी व शेतकऱ्यांना येऊन मोठे जन आंदोलन उभा करणार आहे अशी माहिती शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ कांबळे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली आहे.

---

# प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासाठीच्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला मुदतवाढ




**स्वेरी पॉलिटेक्निकमध्ये मोफत सुविधा केंद्र**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा इंजिनिअरिंग मध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.) क्र.- ६४३७ ला मान्यता मिळाली असून प्रथम वर्ष डिप्लोमा प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याच्या प्रक्रियेला आता मुदतवाढ मिळाली आहे. बुधवार दि. २० मे २०२६ पासून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व अर्ज निश्चिती आदी प्रक्रिया सुरू झाली होती आणि सोमवार दि. २२ जून २०२६ ला संपणार होती पण दरम्यानच्या कालावधीत अनेक विद्यार्थांना प्रशासनाकडून कागदपत्रे व प्रमाणपत्रे उपलब्ध झाली नाहीत. ही बाब लक्षात आल्यामुळे आता या प्रक्रियेला मुदतवाढ मिळाली असून विद्यार्थ्यांना आता दि. ०२ जुलै २०२६ पर्यंत रजिस्ट्रेशन करता येणार आहे. 'आता विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करण्यासाठी फक्त त्यांचा दहावी परीक्षेचा आसन क्रमांक टाकून प्रवेश अर्ज भरता येणार आहे' अशी माहिती डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांनी दिली.

शै. वर्ष २०२६-२०२७ मध्ये प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशाकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, भरलेले अर्ज स्विकारुन प्रमाणपत्रे, कागदपत्रांची तपासणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रिया करण्याकरिता मुंबई येथील मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य (डी.टी.ई) यांनी अधिकृत केंद्र (एफ.सी. क्र.-६४३७) म्हणून मान्यता दिली आहे. पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन, पालकांचा होणारा संभ्रम, संबंधीत कागदपत्रे जमविताना होणाऱ्या अडचणी व शंका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा केंद्र सुरु केले असून यंदाचे स्वेरी डिप्लोमा इंजिनिअरिंगचे १८ वे वर्ष असून उज्वल यशाची परंपरा या महाविद्यालयाने कायम राखली आहे. ही प्रकिया बुधवार दि. २० मे २०२६ पासून ते गुरुवार दि. ०२ जुलै २०२६ सायं. ५ वाजेपर्यंत चालणार आहे. या सुविधेचा लाभ दहावी मधून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, ज्यांनी अजून रजिस्ट्रेशन केले नाही असे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी घ्यावा असे आवाहन केले आहे. दरम्यान या कालावधीत प्रमाणपत्रांची पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी प्रा. एस. एस. गायकवाड (मोबा.क्र.-९८९०५६६२८१) व प्रा. जे. बी. रोडगे (मोबा.क्र. -९७६७८५६०२९) यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने सर्वोत्कृष्ट निकाल, आदर युक्त शिस्त आणि करिअरच्या दृष्टीने सर्वोत्तम संस्कार देण्याची परंपरा कायम राखल्यामुळे स्वेरीच्या 'पंढरपूर पॅटर्न'चा दबदबा कायम आहे. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे एनबीए मानांकन, महाराष्ट्र व गोवा राज्यातील बेस्ट पॉलिटेक्निक कॅम्पस अवॉर्ड, गेली सलग सात वर्षे शंभर टक्के ऍडमिशन होणारे महाराष्ट्रातील बहुधा एकमेव खाजगी महाविद्यालय आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांच्या पसंतीस उतरलेले स्वेरी अभियांत्रिकी हे राज्यात 'ब्रँड' बनले आहे. त्यामुळे स्वेरीत प्रवेशासाठी प्रचंड गर्दी होत आहे. या वर्षीही विद्यार्थी व पालक यांचेकडून स्वेरी डिप्लोमलाच प्रथम पसंती व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. सन २०२६-२०२७ करीता प्रवेशासाठी स्वेरी संचलित डिप्लोमा इंजिनिअरिंग फॅसिलिटेशन सेंटरमध्ये सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अनुसूचित जातींमध्ये फूट पाडण्याचा सरकारचा डाव; भाई कैलास सुखदाने

## छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'आरक्षण बचाव बैठक'



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या आरक्षणावर घाला घालण्याचा आणि अनुसूचित जातींमध्ये फूट पाडण्याचा कोणताही डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. संविधानाने दिलेल्या घटनात्मक अधिकारांवर कुणीही गदा आणण्याचा प्रयत्न केला, तर त्याला रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने चोख उत्तर दिले जाईल, असा इशारा भीमशक्तीचे विदर्भ सरचिटणीस भाई कैलास सुखदाने यांनी राज्य सरकारला दिला.

मेहकर शहरातील आंबेडकर वाटिका येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'आरक्षण बचाव बैठकी' मध्ये ते बोलत होते. यावेळी त्यांनी महायुती सरकारवर घणाघाती टीका करत राज्यात सामाजिक सलोखा बिघडविण्याचे नियोजनबद्ध राजकारण सुरू असल्याचा आरोप केला. भाई कैलास सुखदाने म्हणाले की, यापूर्वी इतर मागासवर्गीय-मराठा, धनगर-अनुसूचित जमाती अशा विविध समाजघटकांमध्ये वाद निर्माण करण्यात आले. आता अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाच्या नावाखाली फूट पाडून संघर्ष पेटवण्याचा डाव रचला जात आहे. झेंडा कोणाचाही असू द्या, पण दांडा आपला असू द्या, असे म्हणत त्यांनी समाजाला निळ्या झेंड्याखाली एकत्रित येण्याचे आवाहन केले. ते पुढे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून अनुसूचित जातींना एकसंध घटनात्मक वर्गाचा दर्जा प्रदान केला आहे. हा घटनात्मक दर्जा कोणत्याही सरकारला किंवा सत्ताधाऱ्यांना त्यांच्या राजकीय सोयीसाठी बदलण्याचा अधिकार नाही. अनुसूचित जात प्रवर्गातील ५९ जातींसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणामध्ये अंतर्गत विभागणी करण्याचा प्रयत्न हा संविधानाच्या मूलभूत तत्त्वांवर आघात करणारा असून, सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच तडा देणारा आहे. आरक्षणासारख्या अत्यंत संवेदनशील विषयाचा राजकीय फायद्यासाठी वापर केल्यामुळे समाजात अस्वस्थता आणि असंतोष वाढत असल्याचा आरोपही भाई कैलास सुखदाने यांनी केला. यावेळी आरक्षण बचाव बैठकीच्या अध्यक्षस्थानीआंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते सोपानराव देबाजे हे होते. अॅड. अनंतराव वानखेडे, भाई कैलास सुखदाने, प्रा. डी. जी. गायकवाड, ड. विष्णू सरदार, विजय मोरे, पुंडलीकराव मोरे, संभाजी वाघमारे, वसंतराव अवसरमोल, राजेश अंभोरे, वसंतराव वानखेडे, नारायण इंगळे, सुनील मोरे, संतोष अवसरमोल, वसंत वानखेडे, सतीश इंगळे, संतोष सरकटे, भिमराव खरात, आबाराव वाघ, पांडूरंग सपकाळ, समाधान सरदार, अशोक अवसरमोल, संघपाल गवई, संजय गवई, आत्माराम अवसरमोल, गजानन जाधव, अॅड. बबनराव वानखेडे, साहेबराव खंडारे, पी. सी.पवार, कविराज पाखरे, श्री गोवेकर, श्रीमती गौकर्णा मोरे, सुवर्णाताई वानखेडे, संगीताताई पवार, यांच्यासह मेहकर मतदारसंघातील अनेक समाजबांधव उपस्थित होते.

# देशभरातून येणाऱ्या वारकरी भाविकांना चांगल्या सुविधा देणार : डॉ. सौ प्रणिता भालके नगराध्यक्ष





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग पंढरपूरच्या राज्यातील महत्त्वाच्या आठ तीर्थक्षेत्राच्या नगरपरिषदा यात्रा कर रद्द केल्यामुळे द्यावयाची सहाय्यक अनुदान योजनेअंतर्गत एकूण आठ कोटी ४५ लाखाचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे यामध्ये पंढरपूर नगरपरिषदेला सर्वाधिक पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे यासाठी पंढरपूरच्या नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता त्यामुळे हे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

पंढरपूरच्या विकास कामांना गती मिळण्यासाठी नागरिकासह देशभरातून येणाऱ्या भाविकांना व वारकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न आहे थकीत असलेले हक्काचे यात्रा कर अनुदान मिळावे यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री उदय सावंत यांच्याकडे आम्ही पाठपुरावा करीत होतो त्यानुसार नगर विकास विभागाने २४ जून रोजी शासन निर्णय जाहीर केला आहे व या निधीतून शहरातील विकास कामांना चांगली गती मिळणार असल्याचे नगराध्यक्ष डॉ प्रणिती भालके यांनी सांगितले.

# स्वेरीमध्ये 'कॅम्पस टू कॉर्पोरेट' व 'कृत्रिम बुद्धिमत्ता प्रॉम्प्ट' विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांचे उदघाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मधील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या वतीने इंजिनिअरिंगच्या सर्व विभागांतील अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार, दि.१८ जून २०२६ पासून ते मंगळवार, दि.२३ जून २०२६ पर्यंत एक आठवड्याच्या 'कॅम्पस टू कॉर्पोरेट' आणि 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रॉम्प्ट' या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमास उत्साहात प्रारंभ झाला आहे. विद्यार्थ्यांना भविष्यात करिअर करताना उद्योग क्षेत्रांच्या अपेक्षांनुसार सक्षम बनविणे, रोजगारक्षम कौशल्यांचा विकास करणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करून भविष्यात शिक्षण देणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमांचे स्वेरीमध्ये नुकतेच उदघाटन झाले.




संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व विविध विभागांच्या प्रमुखांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या हस्ते व सर्व विभागप्रमुखांच्या उपस्थितीत हे उदघाटन झाले. याप्रसंगी उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राच्या अपेक्षांनुसार आवश्यक कौशल्ये विकसित करून प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी आवाहन केले तसेच यासाठी नियमित उपस्थिती, शिस्त आणि सक्रिय सहभाग याद्वारेच विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या अधिकाधिक संधी उपलब्ध होतील असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील कार्यसंस्कृती, व्यावसायिक दृष्टिकोन, कार्यालयीन शिष्टाचार, प्रभावी संवादकौशल्य, व्यावसायिक पत्रव्यवहार, संघर्ष व्यवस्थापन, वाटाघाटी कौशल्य, संघभावना, नेतृत्वगुण, विविध संस्कृतींमध्ये काम करण्याची तयारी, आंतरवैयक्तिक संबंध, वेळेचे नियोजन, आत्मविश्वास विकास तसेच व्यावसायिक वेशभूषा व व्यक्तिमत्त्व विकास यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जात आहे. प्रमुख पाहुणे अॅस्पायरिंग माइंड्सचे प्रशिक्षक विनेश खेर यांनी विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट क्षेत्रातील माहिती दिली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. रविराज माढेकर व डॉ.अभिषेक यांच्या नियोजनातून प्रशिक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार तसेच प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. रविराज माढेकर यांनी विविध प्रशिक्षण वर्गांना भेटी देऊन प्रशिक्षण सत्रांची पाहणी केली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत नियमित उपस्थिती, सक्रिय सहभाग आणि उद्योगाभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थी व प्रशिक्षकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, उद्योग क्षेत्राच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी स्वेरी इंजिनिअरिंगमध्ये सातत्याने अशा रोजगाराभिमुख व कौशल्यवर्धक उपक्रमांचे आयोजन करत असल्याची माहिती प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागामार्फत देण्यात आली.

# निफाड येथील कुलस्वामिनी संगीत विद्यालयाचे संगीत परीक्षा निकालात घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : कुलस्वामिनी व्यक्तिविकास बहुउद्देशीय संस्था संचालित कुलस्वामिनी संगीत विद्यालय, निफाड येथील विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या सन २०२५ च्या संगीत परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.असुन.२१ जून रोजी जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

निफाड शहर व परिसरामध्ये गेल्या १८ वर्षांपासून संगीत शिक्षणाची अखंड परंपरा जोपासणारे कुलस्वामिनी संगीत विद्यालय शास्त्रीय संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. विद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना गायन, वादन तसेच संगीत विषयाचे शास्त्रोक्त शिक्षण दिले जाते असून. यापूर्वीही अनेक विद्यार्थ्यांनी विशारदपर्यंतच्या परीक्षांमध्ये यश मिळवले आहे




विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कुलस्वामिनी व्यक्तिमत्व विकास बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी, पालकवर्ग तसेच निफाड परिसरातील संगीतप्रेमींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे... विद्यार्थ्यांना संस्थेचे प्रमुख सुहास सुरळीकर व अभिजीत सुरळीकर यांनी मार्गदर्शन केले

संगीत परीक्षेचा निकाल खालील प्रमाणे असून

**प्रारंभिक - १ ली परीक्षा**

अद्वेत चौधरी, शौर्या कराड भक्ती आहेर ,निर्मल हिरे आदेश वाघ ,पार्थ तासकर शिव तासकर ,सार्थक सांबरे देवेश राणे, अजिंक्य भोसले शिवनाथ शिरसाट,आराध्या धारराव, प्रतीक चव्हाण , भूषण चोरडीया,

**प्रवेशिका प्रथम - दुसरी परीक्षा**

दर्श जोगी,पार्थ चौधरी आदित्य भोसले ,श्रेयस निकम स्वराज काळे ,रेयांश कोल्हे, रुचिता कानडे ,समीर बर्डे योगेश बर्डे ,आराध्य दाते दुर्वांक रायते,गौरव आहेर ,

**प्रवेशिका पूर्ण तिसरी परीक्षा**

ईश्वरी जेऊघाले ,प्रणिती कुंभार्डे ,ओजस बोराडे ,अर्जुन तांबे ,मोक्ष ठक्कर ,अद्वैत ढेमसे ,अक्षदा पुंड ,अजिंक्य खेलुकर ,जानवी कानडे दर्शन तासकर ,आरुष पाटील शामली सानप ,जानवी पाटील सक्षम गोसावी ,नयन कांदळकर,स्वराज काळे

**मध्यमा प्रथम परीक्षा चौथी**

अन्वित जाधव ,अथर्व वैष्णव आर्यन बोरसे

**मध्यमा पूर्ण परीक्षा पाचवी**

यशराज आहेर ,भूमि तातेड

**विशारद प्रथम परीक्षा सहावी**

कस्तुरी काळे , अथर्व नेरीकर

**विशारद पूर्ण परीक्षा सातवी**

विजया पगार , कृष्णप्रिया कापसे ,कौस्तुभ काळे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे

विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या या यशामुळे निफाड शहरासह परिसरातील पालक वर्गा मधून या विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे

# पंढरपूरात निर्भया पथकामार्फत पथनाटयाचे सादरीकरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आजच्या काळात मुलांची काळजी व संरक्षण, त्यांची सुरक्षितता आणि त्यांच्यामध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करणे ही समाजाची महत्त्वाची गरज आहे. मुलांना पोलीस यंत्रणेशी जवळीक, सुरक्षिततेची भावना आणि अडचणीच्या प्रसंगी मदत मिळण्याचा विश्वास पथनाट्याच्या माध्यमातून निर्माण होईल असे निर्भया पथकप्रमुख पोलीस उपनिरिक्षक सुप्रिया यादव यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंढरपूर येथे सहा.पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथक व स्वेरी कॅालेजचे विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने पथनाटयाचे सादरीकरण करण्यात आले.

समाजातील प्रत्येक जन सुरक्षित, आत्मविश्वासपूर्ण आणि आनंदी राहावे, यासाठी हे पथनाट्य निश्चितच प्रेरणादायी ठरेल.केवळ जबाबदारी नसून एक सामाजिक बांधिलकी आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## कर्नाटक विद्यावर्धक संघाच्या दहाव्या महामेळ्यातील सूर

## कन्नड संघांच्या प्रतिनिधिंच्या दोन दिवसीय महामेळ्याचा शुभारंभ उत्साहात

# कन्नड भाषेच्या जतनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: कन्नड ही केवळ संवादाची भाषा नसून ती कर्नाटकाची संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचे प्रतीक आहे. बदलत्या काळात कन्नड भाषेसमोर उभ्या राहणार्या विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर तिच्या संवर्धनासाठी व्यापक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे मत देशभरातील कन्नड संघटनांच्या महामेळाव्यात व्यक्त करण्यात आले. कर्नाटकाबाहेरील कन्नड भाषिकांना मदत व प्रोत्साहन देण्यासाठी कर्नाटक विद्यावर्धक संघाने राज्य सरकारशी समन्वय साधून ठोस कार्यक्रम राबवावेत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

येथील हुतात्मा स्मृती मंदीरातील शिवयोगी सिध्दरामेश्वर विचारपीठावर धारवाड येथील कर्नाटक विद्यावर्धक संघ यांच्यावतीने आणि सोलापूर जिल्ह्यातील विविध कन्नड संघटनांच्या सहयोगाने आयोजित दहाव्या अखिल भारतीय राज्याबाहेरील (होरनाडू) कन्नड संघांच्या प्रतिनिधिंच्या दोन दिवसीय महामेळ्याचा शुभारंभ उत्साहात झाला. किरीटेश्वरमठाचे निरंजनमूर्ती स्वामीनाथ महास्वामी यांच्या सानिध्यात झालेल्या या मेळ्याच्या अध्यक्षस्थानी कर्नाटक विद्यावर्धक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत बेल्लद होते. यावेळी हंपी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू मल्लिका घंटी, माजी शिक्षण आयुक्त वेंकटेश मल्लप्पनवरू, बसवप्रभु होसकेरी, शंकर कुंबी, शिवानंद भाविकट्टी यांच्यासह विद्यावर्धक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

कोणत्याही दोन भारतीय भाषांमध्ये कोणताही संघर्ष नाही. मात्र सगळ्याचे भाषांना इंग्रजी गिळकृंत करत असल्याने सर्वच भाषांसमोर अस्तित्व जपण्याचे आव्हान आहे. भाषा ही संस्कृती संवर्धनाचे माध्यम आहे. म्हणून प्रत्येकाने कन्नड भाषा जपायला हवी असे आवाहन या महामेळ्यातील वक्तांनी केले. भाषा कधीही संघर्षांचे कारण ठरत नाही. मात्र भाषेच्या आडून राजकारण करणार्यांकडून भाषेचा वापर शस्त्रसारखा होतो, त्यासाठी आपण सर्वांनी सावध राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. बसवप्रभु होसकेरी यांनी प्रास्ताविकात विद्यावर्धक संघाने या पूर्वी घेतलेल्या ९ महामेळांचा आढावा घेतला. सोलापूरात आल्यानंतर आपल्याला कर्नाटकाबाहेर आल्यासारखे अजिबात वाटत नाही. राजकीय सीमा जरी आखल्या गेल्या असल्यातरी संस्कृती एकच असल्याचे होसकेरी यांनी सांगितले.

विद्यावर्धक संघाचे सरचिटणीस शंकर हलगत्ती यांनी स्वागत करून कार्यक्रमाची भूमिका सांगितली. सतिश तुरमरी यांनी आभार मानले. प्रारंभी डॉ.ज्योतीलक्ष्मी कोडलगी यांनी वचन गायन केले. दीपप्रज्वलन आणि नाडगीतेने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

### शरणांची वचने सर्वकालीन मार्गदर्शक

वचनकारांची समकालीन प्रस्तुतता या विषयावरील परिसंवादात कलबुरगी येथील प्रा.मिनाक्षी बाळी यांनी १२ व्या शतकातील शरण चळवळीतून जन्मलेल्या वचन साहित्याचे समकालीनत्व उपगडून दाखविले. शिवयोगी सिध्दरामेश्वर, महात्मा बसवेश्वर आणि अल्लमप्रभु यांच्यासह इतर शरणांच्या वचनांतील दाखले देत डॉ.बाळी यांनी समकालीन संदर्भातील उपयुक्तता सांगितली. आज पूजा पाठ, यज्ञ याग, शतकोटी यज्ञ, कथा पारायण सारख्या कर्मकांडानां अच्छेदिन आल्याच्या पार्श्वभूमिवर वचनांची गरज असल्याचे डॉ.बाळी यांनी सांगितले. या परिसंवादत धारवाड येथील सविता नडकट्टी यांनी शरण साहित्य हे शास्वत साहित्य असून सर्वकालीन मानवजातीला मार्गदर्शक असल्याचे सांगितले. वचन साहित्य वाचविण्यासह शरणांच्या संरक्षणात शिवयोगी सिध्दरामेश्वर आणि राणी चामलादेवी यांचे योगदान मोठे असल्याचे नडकट्टी यांनी सांगितले. 'सोन्नलगी सिद्धराम' या विषयावर डॉ.भिमाशंकर बिराजदार, इंदुमती बसवंती आणि एन.एम. मरूळाराध्य यांनी आपले विचार मांडले. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. के.एस.कौजलगी होते.

# अक्कलकोटमध्ये मोहरमचा सोहळा शांततेत, उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न

## गृहराज्यमंत्री सिद्धारामजी म्हेत्रे साहेब व हर्षवर्धन अमोलराजे भोसले यांच्या हस्ते नाईकवाड गल्ली डोलीचे उद्घाटन; एस. एस. पैलवान लेझीम संघाच्या तिसऱ्या वर्षीही जलवा कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :

अक्कलकोट शहरात मोहरमचा पवित्र सोहळा शुक्रवारी अत्यंत शांततेत, अति उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. शहरातील मौलाली गल्ली, माणिक पेठ, बुधवार पेठ आणि नाईकवाडी गल्ली येथून परंपरेनुसार पंजे व ताबूत (डोली) च्या विसर्जन मिरवणुका काढण्यात आल्या.

**मान्यवरांच्या हस्ते डोली मिरवणुकीचे उद्घाटन**

नाईकवाडी गल्ली येथील डोली मि रवणुकीचे उद्घाटन माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे साहेब व अमोल राजे भोसले यांचे चिरंजीव हर्षवर्धन अमोल राजे भोसले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी परिसरातील प्रतिष्ठित नागरिक व युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी सर्वांना मोहरमच्या शुभेच्छा देत शांतता व बंधुभावाचा संदेश दिला.

**कारंजा चौकात लेझीम संघाचे उद्घाटन व मान्यवरांचा सत्कार.**

अक्कलकोट शहरातील कारंजा चौक येथे नगरसेवक सद्दाम शेरीकर यांनी एस. एस. पैलवान लेझीम संघाचे उद्घाटन व भाविकांसाठी शरबत वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी शहरातील विविध मान्यवर स्टेजवर उपस्थित होते. नगरसेवक सद्दाम शेरीकर मित्र परिवाराच्या वतीने प्रमुख मान्यवरांचा स्व-ागत व सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला सुरेश सूर्यवंशी (वकील काका), सुरेश चिलावर झ ख साहेब, दिलीप भाऊ सिद्धे, सुनील सिद्धे,नूर अहमद शेरीकर,नगरसेवक देविदास कवटगी, अविनाश म डीखांबे,हर्षवर्धन अमोल राजे भोसले, नगरसेवक कापसे, उपनगराध्यक्ष बंटी



राठोड, कांतु धनशेट्टी, प्रदीप पाटील, इरफान दावना, शिकुर शेख, तडमुड फुफा, आनंद जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

**पोलीस प्रशासनाचे चोख सहकार्य, रात्री १० वाजता शिस्तबद्ध विसर्जन**

अक्कलकोट पोलीस प्रशासनाने संपूर्ण मिरवणूक मार्गावर चोख बंदोबस्त ठेवला होता. मिरवणुका संपेपर्यंत पो-लीस अधिकारी व कर्मचारी तैनात होते. पोलीस प्रशासनाने दिलेल्या नियमांचे व वेळेचे तंतोतंत पालन करून शहरा-तील सर्व पंजे व डोली मिरवणुकांचे रात्री १०:०० वाजता विसर्जन करण्यात आले. पोलीस प्रशासन व नागरिकांच्या उत्कृष्ट सहकार्याने संपूर्ण सोहळा शांततेत पार पडल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

**भाविकांसाठी शरबत व मसाला ज्यूस वाटप**

मिरवणुकीच्या मार्गावर शहरा-तील विविध ठिकाणी भाविकांसाठी शरबत व मसाला ज्यूसचे वाटप करण्यात आले होते. या अली, या हुसैन च्या गजरात आणि धार्मिक वातावरणात हजारो भाविकांनी मिरवणुकीत सहभाग नोंदवला.

**एस. एस. पैलवान लेझीम संघाचे सलग तिसरे वर्ष**

यंदाच्या मोहरम मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले ते नगरसेवक सद्दाम शेरीकर यांचे एस. एस. पैलवान लेझीम संघ, अक्कलकोट. सलग तिसऱ्या वर्षीही या संघाने आपल्या सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली. नगरसेवक शेरीकर यांनी तब्बल १५ ते २० दिवस तरुणांना लेझीमचा सराव करून त्यांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या या प्रोत्स-ाहनाला तरुणांनी शंभर टक्के प्रतिसाद देत मिरवणुकीत शिस्तबद्ध व जोश-पूर्ण लेझीम सादर केली. पांढऱ्या शुभ्र वेशातील लेझीम पथकाच्या एकसंध नादाने संपूर्ण शहर दुमदुमून गेले.

**मोहरमच्या निमित्ताने अक्कलकोटने पुन्हा एकदा दाखवून दिले की इथे धर्मापेक्षा माणुसकी मोठी आहे. शांतता, एकता आणि भक्तीचा हा संगम कायम राहो.**

**– सोहेल फरास सामाजिक कार्यकर्ते अक्कलकोट**

**हत्ती तलाव साखर विहिरीजवळ सांगता**

शहरातील सर्व पंजे व डोलींचे नाईकवाडी गल्ली येथील हत्ती तलावा जवळील साखर विहीर येथे विसर्जन करून मोहरम सोहळ्याची सांगता करण्यात आली.

यावेळी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे व सामाजिक सलोख्याचे अनोखे दर्शन घडले अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली.

# डॉ. दत्तात्रय गायकवाड यांना समता पुरस्कार प्रदान व पुस्तक प्रकाशन संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे /प्रतिनिधी : ज्येष्ठ आंबेडकरी लेखक व अभ्यासक डॉ. दत्तात्रय गायकवाड लिखित ' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक अन्वयार्थ' या समीक्षा फाउंडेशन प्रकाशित पुस्तकाचे प्रकाशन जेष्ठ जलतज्ञ व पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ. दत्ता देशकर, एडवोकेट धनंजय सिंहासने, एमआयटीच्या

प्रा. नीलम पंडित आणि फलटन मुधोजी महाविद्यालयाचे डॉ. प्रा. नवनाथ रासकर व इतर मान्यवरांचे हस्ते प्रकाशन संपन्न झाले. डॉ. गायकवाड यांचे हे तिसावे प्रकाशन होते.

तसेच कराड वैभव चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने एडवोकेट धनंजय सिंहासने व सचिव नवनाथ शिंदे यांनी डॉक्टर दत्तात्रय गायकवाड यांना समाज परिवर्तन क्षेत्रात समता स्वातंत्र्य बंधुता आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणारे साहित्य प्रसिद्ध केल्याबद्दल 'समता पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

एडवोकेट सिंहासने आणि डॉ. दत्ता देशकर व इतर मान्यांयवरांचे हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, फुलेफ ेटा आणि उपरणे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बुलढाण्याचे साहित्यिक सुरेश साबळे, नांदेडचे बाबुराव पाईक,

प्रा. डॉ. म. ना. गायकवाड, केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्राचे सेवानिवृत्त ग्रंथपाल बी वाय जोशी, एम के पवार, हृदयप्रकाश, हर्षांनद सोनवणे, बुद्धाचार्य व केंद्रीय शिक्षक राजेंद्र सोनवणे, कवी अनंतराव जाधव तसेच सामाजिक कार्यकर्ते विजय पंडित, डॉ. मुंकूद सोनकांबळे, हजर होते.

डॉ गायकवाड यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त समीक्षा फाउंडेशन आयोजित आंबेडकरवादी कवी संमेलनात हर्षानंद सोनवणे कवी अनंतराव जाधव, एम के पवार, आंबेडकवादी कवी सुनील गायकवाड आणि नांदेडचे बाबुराव पाईक यांनी क्रांतिकारी कविता सादर केल्या.

डॉ. दत्ता देशकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, मानवी जीवनात पाण्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. पाणी समतोल व विवेकाने वापरावे. पाणीसाठा सम ुद्रात अधिक असला तरी पिण्याचे पाणी व औद्योगिक वापरासाठी वापरण्यात येणारे पाणी यासाठी आपल्या पाण्याचे नियोजन आपण नीटपणे केले पाहिजे. म्हणून त्यांनी सिंगापूर व इतर देशातील पाणी उप-लब्धतेचा आढावा घेतला. यावेळी प्राध्यापक पंडित, डॉ. नवनाथ रासकर, सुरेश साबळे, बाबुराव पाईकराव, बी वाय जोशी, हर्षानंद सोनवणे, डॉ. म. ना. गायकवाड यांची मनोगतपर भाषणे झाली. डॉ. दत्तात्रय गायकवाड यांनी आपल्या सत्काराचे उत्तर भाषणात, त्यांनी म हाविद्यालयीन शिक्षण कसे पार पडले यावर आपला संघर्ष सांगितला. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदर्श मानून, ज्ञान म्हणजे प्रकाश. त्यांनी प्रकाशाच्या दिशेने वाटचाल केली. प्रकाश किरणे अंगावर आली. झाडाचे अंकुर जसे साल फोडून बाहेर येते तशा वेदना सहन केल्या. नवनिर्मिती करताना वेदना होतात. व्यासंग, जिद्द, प्रामाणिकपणा, सातत्य व अभ्यासूवृत्ती असल्यानेच ते परिस्थितीशी संघर्ष करत जी-वनात वाटचाल केली. म्हणूनच ते आत्तापर्यंत सुमारे ३० ग्रंथांचे लेखन करू शकले हे त्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य निलेश गायकवाड यांनी केले.

# नळदुर्ग येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थिनींना त्रैमासिक पासचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थीनीना त्रैमासिक १०० टक्के सवलतीच्या एस. टी. पासचे वाटप वाहतूक नियंत्रक महेश डुकरे व म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. आज महाविद्यालयात घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य




डॉ.सुभाष राठोड यांच्या हस्ते वाह-तुक नियंत्रक महेश डुकरे यांचा शाल व पुष्पहार घालून महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात येऊन उपस्थित विद्यार्थिनींना पासचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील उपप्राचार्य डॉ.अशोक कदम, डॉ. एन. बी. जाधव, डॉ.दिपक जगद-ाळे, डॉ.एच. एम. मिर्जा, डॉ.अतिश तिडके,प्रा.एच. व्ही.पाटील, प्रा.के. पी.भोसले, प्रा.काळे के.एम. ,डॉ सावते बी.एस.,प्रा.पी. के.पिरजादे , डॉ.जयश्री घोडके, प्रा.झरीना पठाण प्रा.कल्पना जाधव, प्रा.उषा बदने , प्रा.बेले जी.डी., विजय सुरवसे,शाम पाटील यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# राज्य संचालक डॉ. महेश पालकर यांची मैंदर्गी येथील शाळांना भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी तालुक्यातील मैंदर्गी तालुक्यातील जिल्हा परिषद आणि माध्यमिक शाळांना भेट देऊन मध्यान्ह भोजन योजनेची पाहणी केली.

शनिवारी सकाळी अच-ानक दिलेल्या भेटीत त्यांनी सर्वप्रथम कन्नड मुलींची शाळा, मुलांची शाळा, मराठी शाळा आणि शिवाचलेश्वर माध्यमिक शाळेला भेट देऊन शाळांच्या 'प्रधानमंत्री पोषण शक्ती आहार (मध्यान्ह) भोजन योजने'ची सखोल पाहणी केली. त्यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार म ुलांना दिल्या जाणाऱ्या अन्नाचा दर्जा, अन्नप्रणाली, त्यातील पौष्टिक घटक, स्वयंपाकघर, स्वयंपाक्यांचे आरोग्य, धान्याची साठवणूक, स्वच्छता इत्यादींची काटेकोरपणे तप-ासणी केली. काही चुका बद्दल त्यांनी मुख्याध्यापकांना कडक ताकीद दिली. वर्गांमध्ये जाऊन मुलांना प्रश्न विचारुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणवत्ता तपासले. जे चांगले होते त्याचे त्यांनी कौतुक केले. दर्जा सुधारण्यासाठी त्यांनी काही सूचना दिल्या. जिल्हा प्राथमि क शिक्षण अधिकारी कादर शेखा यांनी विद्यार्थ्यांचा दर्जा आणि शिस्त, आरोग्य आणि स्वच्छता विभागांची पाहणी केली. त्यांनी सूचना दिल्या आणि भविष्यात त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी कन्नड मुलांच्या शाळेतील जेवणाची चव घेतली आणि कौतुक व्यक्त केले. मुख्याध्यापक शिवानंद गोगाव, सदाशिव कोळी, आरती रंगदाळ आणि शिवचलेश्वर हायस्कूलचे मुख्याध्यापक आनंद हरवळकर यांनी संचालकाने दिलेल्या सूचनांनुसार भविष्यात चुका टाळण्याची काळजी घेण्याचे आश्वासन दिले. सोलापूर जिल्हा म ाध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, अक्कलकोट गट शिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, पोषण अध-ीक्षक मयुर पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, तालुका पोषण आहार समन्वयक प्रशांत गुरुव आदी उपस्थित होते.



**महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी जिल्हा परिषद आणि माध्यमिक शाळांना भेट देऊन मध्यान्ह भोजन योजनेची पाहणी केली. यावेळी सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षण अधिकारी सचिन जगताप, प्राथमिक शिक्षण अधिकारी कादर शेख, अक्कलकोट गटशिक्षण अधिकारी प्रशांत अरबाळे आणि इतर अनेक जण उपस्थित होते.**

**लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम**

**भैरवनाथ कानडे यांचे प्रतिपादन**

# छत्रपती राजर्षी शाहूंचा सामाजिक न्यायाचा वारसा शिक्षणातून जपा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्याय, सम ता आणि स्वाभिमानाची चळवळ उभी केली. आजच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत संविधानिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि मानव-तेचा विचार आत्मसात करून सम ाजपरिवर्तनाचे वाहक बनावे,असे प्रतिपादन प्रेरणादायी वक्ते भैरवनाथ कानडे यांनी केले.

सामाजिक न्याय आणि समतेचा संदेश देणारे लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या वतीने सामाजिक न्याय दिन तसेच आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ गैरवापर व तस्करी विरोधी दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करून त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सचिन कवले होते.

प्रमुख वक्ते म्हणून प्रेरणादायी वक्ते भैरवनाथ कानडे आणि डॉ. संदीप तांबारे यांनी मार्गदर्शन केले. तसेच दिव्यांग कल्याण आर्थिक विकास म हामंडळाचे व्यवस्थापक सचिन बांगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त शंकर खुने, विजयकुमार गायकवाड आणि ड. बडेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रास्ताविकात अध्यक्ष सचिन कवले यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, सामाजिक न्यायाची संकल्पना त्यांनी प्रत्यक्ष शासन व्यवस्थेत रुजविली. शिक्षण, आरक्षण, शिष्यवृत्ती आणि वसतिगृहांच्या माध्यमातून वंचित समाजघटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श प्रत्येकाने आचरणात आणणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

'राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार आणि सामाजिक न्याय' या विषयावर मार्गदर्शन करताना भैरवनाथ कानडे यांनी शिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे सर्वाधिक प्रभावी साधन असल्याचे सांगितले. राजर्षी शाहू महाराजांनी वसतिगृहे, शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण आणि आरक्षणाच्या धोरणांद्वारे वंचित समाजाला नवी दिशा दिली. आजच्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी सामाजिक न्यायाची मूल्ये जपत प्रत्येक विद्यार्थ्याकडे समानतेच्या दृष्टीने पाहून शिक्षणातून परिवर्तन घडविण्याची भूमिका निभावावी, असे आवाहन त्यांनी केले.

आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ गैरवापर व तस्करी विरोधी दिनानिमित्त युवकांना व्यसनमुक्त जीवनाचा संदेश देताना डॉ. संदीप तांबारे म्हणाले की, मादक पदार्थांचे व्यसन हे व्यक्ती, कुटुंब आणि समाजासाठी घातक आहे. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, आरोग्य आणि सकारात्मक जीवनशैलीचा स्वीकार करावा. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी व्यापक जनजागृती आणि सामूहिक सहभागाची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन युवराज चव्हाण यांनी मानले. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांचा जागर, विद्यार्थ्यांचा गौरव आणि व्यसनमुक्तीचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

